

वर्ष - 8 । अंक -171 UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com सोमवार, दिनांक 30 डिसेंबर 2024 पुणे आवृत्ती mahaenews.com maha_enews Mahaenews

## आतील पानांत


- रहमत शाहचे ऐतिहासिक द्विशतक!
- आफ्रिका WTC फायनलमध्ये दाखल
- नव्या वर्षात दिसणार यंग ब्रिगेड
- काश्मिरात हिमवृष्टीने जीवन विस्कळीत


### अजित पवार, चंद्रकांत पाटील यांच्यासह सोलापूर, सांगलीबाबतही उत्सुकता

# पालकमंत्रिपदावरून शीतयुद्ध!

### बीडचे पालकमंत्रिपद मुंडे बहीण-भावाला न देता बाहेरील जिल्ह्यातील नेत्याला देण्याची शक्यता

**। पुणे । महाईन्यूज**

**उपमुख्यमंत्री अजित पवार, भाजपचे ज्येष्ठ नेते, उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्यासह पश्चिम महाराष्ट्रात नऊ कॅबिनेट; तसेच एक राज्यमंत्री नियुक्त केल्याने पालकमंत्रिपद कोणाकोणाला द्यायचे, यावरून जोरदार शीतयुद्ध रंगले आहे. बीडचे पालकमंत्रिपद मुंडे बहीण-भावाला न देता बाहेरील जिल्ह्यातील नेत्याला देण्याची दाट शक्यता आहे. ही जबाबदारी पश्चिम महाराष्ट्रातील एका मंत्र्यावर सोपवायची की नाही, यावर जोरदार खलबते सुरू असल्याचे समजते.**



पवार पुण्याचे पालकमंत्री होण्याची दाट शक्यता आहे. पाटील यांना कोणता जिल्हा मिळणार, यावर पश्चिम महाराष्ट्रातील राजकीय गणिते अवलंबून आहेत. सोलापूर आणि सांगली जिल्ह्यांना मंत्रिपद मिळालेले नाही. त्यामुळे या जिल्ह्याचे पालकमंत्रिपद मिळवण्यासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे.

पश्चिम महाराष्ट्रात पुणे आणि सातारा जिल्ह्यांना प्रत्येकी चार आणि कोल्हापूरला दोन अशी दहा मंत्रिपदे मिळाली आहेत. पुण्याच्या पालकमंत्रिपदासाठी पवार अत्यंत आग्रही असतात. गेल्या वेळीही पाटील यांच्याकडील पुण्याचे पालकमंत्रिपद त्यांनी स्वतःकडे घेतले होते. या वेळीही तेच पुण्याचे पालकमंत्री असू शकतील. साताऱ्यात चार कॅबिनेट मंत्री आहेत. त्यामुळे यापैकी एकाची वर्णी पालकमंत्रिपदी लागेल, अशी चर्चा आहे.

कोल्हापूरमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे हसन मुश्रीफ आणि शिवसेनेचे प्रकाश आबिटकर यांच्यात पालकमंत्री पदावरून रस्सीखेच आहे. कोल्हापूरचे चंद्रकांत पाटील पुण्यातून निवडून आले असले; तरीही त्यांना कोल्हापूरच्या पालकमंत्रिपदाची जबाबदारी मिळू शकते. मुश्रीफ पालकमंत्रिपदासाठी अत्यंत आग्रही असल्याचे चित्र गेल्या वेळी दिसले होते. त्यामुळे ते या पदासाठी प्रतिष्ठेचा विषय करू शकतात. दत्ता भरणे यांच्याकडे महाविकास आघाडी सरकारच्या काळात सोलापूरची जबाबदारी होती. त्यामुळे सोलापूर मिळवण्यासाठी त्यांचाही प्रयत्न असणार आहे. या पार्श्वभूमीवर पुण्यातील आणि साताऱ्यातील प्रत्येकी दोन; तसेच कोल्हापुरातील एक अशा पाच मंत्र्यांनी सोलापूर आणि सांगलीचे मंत्रिपद मिळवण्यासाठी जोरदार फिल्डिंग लावली आहे.

#### बीडमध्ये मुंडे नकोत?

बीड जिल्ह्यातील राजकारण सध्या राज्यातील सर्वाधिक चर्चेचा विषय ठरला आहे. वाल्मिक कराड प्रकरणावरून धनंजय मुंडे टीकेचे धनी ठरले आहेत. बीडमधील जातीय तणाव हा कळीचा मुद्दा झाला आहे. या पार्श्वभूमीवर बीडमध्ये धनंजय आणि पंकजा मुंडे या दोघाही भाऊ-बहिणींना पालकमंत्रिपद देऊ नये, अशी सरकारमध्ये चर्चा आहे. त्यामुळे बीडचे पालकमंत्री कोण होणार, की पश्चिम महाराष्ट्रातील एका मंत्र्याला ही जबाबदारी दिली जाणार, अशी दबक्या आवाजात चर्चा आहे.

#### दादांकडे कुठली जबाबदारी?

गेल्या सरकारमध्ये पुण्याचे पालकमंत्रिपद गेल्यानंतर चंद्रकांत पाटील यांच्याकडे सोलापूर आणि अमरावती अशा दोन जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आली होती. या वेळी पश्चिम महाराष्ट्रात १० मंत्रिपदे असल्याने पाटील यांना कुठल्या जिल्ह्याची जबाबदारी दिली जाणार, यावर राजकीय गणिते अवलंबून आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पाटील यांच्याकडे मोठी जबाबदारी दिली जाऊ शकते.

---

### हिरव्या रंगावर भगवा रंग, जागो हिंदू जागो....

### भिंतीवरील रंगांचा वाद हलक्यात घेऊ नका; खासदार मेधा कुलकर्णी संतापल्या

**। पुणे । प्रतिनिधी : महाईन्यूज**



पुण्यात सदाशिव पेठेत सध्या कलर वॉर रंगलं आहे. पण हा केवळ रंगाचा विषय नाही तर त्यामाध्यमातून जागा काबीज करण्यात येत असल्याचा आरोप भाजपा खासदार मेधा कुलकर्णी यांनी केला आहे. सदाशिव पेठेत एका भिंतीच्या कोपऱ्यात हिरवा रंग देण्यात आला. तिथं चादर लावून फुलं चढवण्यात आल्याचा प्रकार समोर आला. हा प्रकार समोर आल्यानंतर भाजपा खासदार मेधा कुलकर्णी यांनी या ठिकाणी तातडीनं भेट दिली. त्यांनी आणि कार्यकर्त्यांनी हिरव्या रंगावर भगवा रंग दिला. त्याठिकाणी गणपतीचा फोटो ठेवला. त्यावरून आता चर्चेला पेव फुटले आहेत.

या घटनेनंतर मेधा कुलकर्णी यांनी समाज माध्यमावर याविषयीची पोस्ट केली. काल सदाशिव पेठेतील ज्ञानप्रबोधिनी शाळेच्या शेजारील गल्लीत हिरवा रंग देऊन, त्याठिकाणी हार, फुले, अगरबत्ती लावण्यात आल्याचे समोर आले. त्याचे फोटो आणि व्हिडिओ व्हाट्सअपवर व्हायरल झाले. त्यामुळे या ठिकाणी आवर्जून दाखल झाले. मला व्हाट्सअप वर माहिती समजली ती मी व्हेरिफाय केली. तिथं कधीही यापूर्वी हिरवा रंग किंवा प्रार्थनास्थळामध्ये रूपांतर करण्याचा प्रयत्न झाला नव्हता. ती भिंत एका संस्थेच्या इमारतीचा पार्ट आहे. मला अनेकांनी व्हाट्सअप वर तो मेसेज पाठवला होता. आम्ही तिथे ॲक्शन घेतली हिरव्याच भगव करून टाकलं.

# यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करताना अडचणी!

## रस्त्यांची पाहणी झाल्यानंतर फेरआढावा घेऊन बदल केले जाणार

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शहरातील १८ मीटर आणि त्यापेक्षा मोठ्या रस्त्यांवर, पदपथावर सद्य:स्थितीत महापालिकेची स्थापत्यविषयक कामे सुरू असल्याने अशा रस्त्यांवर यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करताना अडचणी येत आहेत. त्यामुळे आठही क्षेत्रीय कार्यालयांतील रस्त्यांची पाहणी करण्यात येत आहे. चार क्षेत्रीय कार्यालयातील रस्त्यांची पाहणी पूर्ण झाली आहे.**



आठही कार्यालयांतील रस्त्यांची पाहणी झाल्यानंतर फेरआढावा घेऊन बदल केले जाणार आहेत.पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील १८ मीटर आणि त्यापेक्षा जास्त रुंदीचे रस्ते यांत्रिकी पद्धतीने साफ केले जातात. शहराचे दक्षिण आणि उत्तर असे दोन भाग केले आहेत. फेब्रुवारी २०२४ पासून यांत्रिकी पद्धतीने चार विभागांत काम सुरू असून, त्यासाठी चार संस्था कार्यरत आहेत. प्रत्येक विभागात दोन मोठी, दोन मध्यम रस्तेसफाई वाहने, दोन हायवा, एक पाण्याचा टँकर अशा वाहनांचा समावेश आहे. या वाहनांचे संचलन करण्यासाठी प्रत्येक विभागात ३२ सफाई कर्मचारी, नऊ वाहनचालक, दहा ऑपरेटर, चार मदतनीस अशा ५५ कामगारांद्वारे कामकाज करणे अपेक्षित आहे. प्रत्येक रस्तेसफाई वाहनाद्वारे दररोज ४० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची साफसफाई करणे आवश्यक आहे.शहरातील १८ मीटर आणि त्यापेक्षा जास्त रुंदीचे रस्ते, बीआरटीएस, महामार्गावरील पदपथ आणि सेवा रस्त्याच्या दोन्ही बाजूंची आठवड्यातून तीन वेळा, मुख्य मार्गावरील मधल्या रस्त्याची, रस्त्याच्या कडेच्या भिंतीच्या परिसराची आठवड्यातून एकदा साफसफाई करणे आवश्यक आहे. मात्र, शहरातील विविध रस्त्यांवर स्थापत्यविषयक आणि पदपथ विकासाची कामे सुरू आहेत. त्यामुळे यांत्रिकी पद्धतीने साफसफाई करण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे आरोग्य विभागाच्या निदर्शनास आले आहे. शहरातील १८ मीटर आणि त्यापेक्षा जास्त रुंदीच्या रस्त्यांची यांत्रिकी पद्धतीने दिवसाआड, तीन दिवसांनी, आठ दिवसांनी साफसफाई केली जाते. जास्त वर्दळ असलेल्या पुणे-मुंबई महामार्ग आणि औंध-रावेत या मार्गावर सद्य:स्थितीत दिवसाआड साफसफाई केली जात आहे. मात्र, या मार्गांवर वाहनांची संख्या जास्त असल्यामुळे टायरमधून माती, धूळ जास्त प्रमाणात असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे या दोन्ही मार्गांवर आता दररोज यांत्रिकी पद्धतीने सफाई केली जाणार आहे.रस्ते, पदपथांवर स्थापत्य विभागाच्या वतीने विकासकामे सुरू असल्याने साफसफाई करताना अडचणी येत आहे. त्यामुळे आठही क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील रस्त्यांचा फेरआढावा घेण्यात येत आहे. आत्तापर्यंत चार क्षेत्रीय कार्यालय हद्दीतील रस्त्यांचा आढावा पूर्ण झाला असून, रस्तेसफाईसाठी काही बदल करण्यात आले आहेत. ज्या रस्त्यांवर अधिकृतपणे वाहनतळाची व्यवस्था आहे, असे रस्ते पहाटेच साफ करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे सहायक आयुक्त अजिंक्य येळे यांनी सांगितले.

### दोन रस्त्यांची दररोज साफसफाई

शहराचे दक्षिण आणि उत्तर असे दोन भाग केले आहेत. फेब्रुवारी २०२४ पासून यांत्रिकी पद्धतीने चार विभागांत काम सुरू असून, त्यासाठी चार संस्था कार्यरत आहेत. प्रत्येक विभागात दोन मोठी, दोन मध्यम रस्तेसफाई वाहने, दोन हायवा, एक पाण्याचा टँकर अशा वाहनांचा समावेश आहे. या वाहनांचे संचलन करण्यासाठी प्रत्येक विभागात ३२ सफाई कर्मचारी, नऊ वाहनचालक, दहा ऑपरेटर, चार मदतनीस अशा ५५ कामगारांद्वारे कामकाज करणे अपेक्षित आहे. प्रत्येक रस्तेसफाई वाहनाद्वारे दररोज ४० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची साफसफाई करणे आवश्यक आहे.शहरातील १८ मीटर आणि त्यापेक्षा जास्त रुंदीचे रस्ते, बीआरटीएस, महामार्गावरील पदपथ आणि सेवा रस्त्याच्या दोन्ही बाजूंची आठवड्यातून तीन वेळा, मुख्य मार्गावरील मधल्या रस्त्याची, रस्त्याच्या कडेच्या भिंतीच्या परिसराची आठवड्यातून एकदा साफसफाई करणे आवश्यक आहे.

# विजयस्तंभ अभिवादनानिमित्त वाहतूकीत बदल

## नववर्षाच्या पूर्वसंध्येपासून एक जानेवारीपर्यंत पर्यायी मार्ग

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कोरेगाव भीमा येथे एक जानेवारी २०२५ रोजी विजयस्तंभ अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. पुणे-नगर महामार्गावरील वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मंगळवारी (३१ डिसेंबर) दुपारी दोन वाजल्यापासून वाहतूक बदल करण्यात येणार आहेत.**



अभिवादन कार्यक्रमास राज्यभरातून आंबेडकरी चळवळीतील अनुयायी उपस्थित राहणार असल्याने वाहतूक बदल करण्यात येणार आहे. वाहतूक बदलाबाबतचे माहिती देणारे फलक ठिकठिकाणी लावण्यात येणार असून, वाहनचालकांनी सहकार्य करावे , असे आवाहन वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे. नगर रस्त्यावरील वाहतूक बदल एक जानेवारी २०२५ रोजी रात्री बारा वाजेपर्यंत लागू राहणार आहे. पुण्याकडून नगरकडे जाणाऱ्या वाहनांनी खराडी बाह्यवळण मार्गावरुन वळून मुंढवा, मगरपट्टा चौक, पुणे-सोलापूर रस्ता, केडगाव चौफुला, न्हावरा, शिरुरमार्गे नगर रस्त्याकडे जावे. सोलापूर रस्त्याने आळंदी, चाकणकडे जाणाऱ्या वाहनांनी हडपसर, मगरपट्टा चौक, खराडी बाह्यवळण मार्गावरुन विश्रांतवाडीकडे जावे.

तेथून आळंदी आणि चाकणकडे जावे. मुंबईकडून नगरकडे जाणाऱ्या वाहनांनी वडगाव मावळ, चाकण, खेड, मंचर, नारायणगाव, आळेफाटामार्गे नगरकडे जावे. मुंबईहून नगरकडे जाणाऱ्या हलक्या वाहनांनी वडगाव मावळ, चाकण, खेड, पाबळ, शिरुरमार्गे नगरकडे जावे.मगरपट्टा चौक येथून नगरकडे जाणाऱ्या वाहनचालकांनी हडपसर येथून केडगाव चौफुलामार्गे शिरुकडे जावे.इंद्रायणी नदीवरील आळंदी-तुळापूर पूल जड वाहतुकीस बंद करण्यात आल्याने या पुलावरुन केवळ अनुनायांच्या हलक्या वाहनांना प्रवेश देण्यात येणार आहे. विश्रांतवाडी, लोहगावमार्गे वाघोलीकडे जाणारी जडवाहतूक बंद ठेवण्यात येणार आहे. विजयस्थंभ अभिवादन कार्यक्रमासाठी येणाऱ्या अनुनायांसाठी प्रशासनाने वाहने लावण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहेत. वाहने लावण्याची ठिकाणे पुढीलप्रमाणे- लोणीकंद येथील आपले घर, हॉटेल गणेश मिसळजवळ, तुळापूर रस्ता हॉटेल शेतकरी मिसळ शेजारी, निसर्ग लॉज शेजारी, फुलगाव सैनिकी शाळा मैदान, थेऊर रस्ता, सोमवंशी ॲकडमी शेजारी, खंडोबाचा माळ, पेरणे फाटा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा

### अवजड वाहनांना बंदी

शहरात जड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. लोणी काळभोर परिसरातील थेऊर फाटा, खडकीतील हॅरीस पूल, विश्रांतवाडीतील बोपखेल फाटा, बाणेरमधीमल राधा चौक, सिंहगड रस्ता भागातील नवले पूल, कात्रज चौक, कोंढव्यातील खडी मशीन चौक, फुरसुंगीत मंतरवाडी फाटा, मरकळ पुल येथून शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या जड वाहनांना बंदी घालण्यात आली आहे.वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त अमोल झेंडे यांनी केले आहे.मगरपट्टा चौक, पुणे-सोलापूर रस्ता, केडगाव चौफुला, न्हावरा, शिरुरमार्गे नगर रस्त्याकडे जावे. सोलापूर रस्त्याने आळंदी, चाकणकडे जाणाऱ्या वाहनांनी हडपसर, मगरपट्टा चौक, खराडी बाह्यवळण मार्गावरुन विश्रांतवाडीकडे जावे.

## तीन कोटी 71 लाख 78 हजार रुपयांचा दंड वसूल

# 'बीआरटी'त घुसखोरी करणाऱ्यांवर कारवाई!

### बीआरटी मार्ग रिकामा असल्याने, वाहनचालक भरधाव असल्याने अनेक अपघात

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शहरात गेल्या ११ महिन्यांत बीआरटी मार्गामध्ये घुसखोरी करणाऱ्या ३९ हजार ५०७ वाहनांवर कारवाईचा बडगा उगारण्यात आला आहे. या वाहनचालकांकडून तीन कोटी ७१ लाख ७८ हजार रुपयांचा दंड वसूल केला आहे. शहरात जलद सार्वजनिक वाहतुकीसाठी बीआरटी मार्गाची आखणी करण्यात आली. शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीतून मार्ग काढण्यासाठी खासगी वाहनचालकांकडून मागील काही काळापासून बीआरटी मार्गात सर्रास घुसखोरी सुरू आहे.**

बीआरटी मार्ग रिकामा असल्याने आणि वाहनचालक भरधाव असल्याने अनेक अपघात घडले आहेत. त्यातच मागील दोन वर्षांपासून पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएल) बीआरटी मार्गातील वॉर्डन हटविले आहेत. त्यामुळे वाहनचालक बीआरटी मार्गात प्रवेश करत आहेत. आगामी काळातही बीआरटीमध्ये घुसखोरी करणाऱ्यांवर कारवाई सुरूच राहणार असल्याचा इशारा वाहतूक विभागाचे पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिला आहे.

बीआरटी मार्गात घुसखोरी करणाऱ्या वाहनचालकांकडून 'नो एण्ट्री'साठी ५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात येणार आहे. याशिवाय वाहन परवाना नसणे, मोबाइलवर बोलणे, सीट बेल्ट न लावणे, आवश्यक कागदपत्रे न बाळगणे आणि जुनी दंडवसुलीही करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### हे आहेत बीआरटी मार्ग

स्वारगेट-कात्रज, संगमवाडी-विश्रांतवाडी, येरवडा-आपले घर, सांगवी-किवळे रोड, निगडी-दापोडी, काळेवाडी फाटा-स्पाइन रोड व दिघी-आळंदी आदी मार्गावर १४८ बॅरियर बसविले जाणार आहेत.



### सद्य:स्थिती काय?

१० लाख - पीएमपीचे रोजचे सरासरी प्रवासी
१ कोटी ३५ लाख - पीएमपीचे रोजचे सरासरी उत्पन्न
१२ लाख - रोजची प्रवासी संख्या
१.५ कोटी - रोजचे उत्पन्न

### या ठिकाणी पायलट प्रोजेक्ट

जगताप डेअरी, काळेवाडी फाटा, डेक्कन कॉलेज व विश्रांतवाडी चौक येथील साठे बिस्कीट, तसेच काळेवाडी ते स्पाइन रोडवरच्या बीआरटी मार्गावर आठ ठिकाणी बॅरियर बसविण्यात आले.

---

## सायबर क्राईम : वर्षभरात ४२९ करोडचा नागरिकांना गंडा

### 37 हजार तक्रारी, पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तांच्या हद्दीमध्ये सायबर क्राईमच्या घटनांनी वेधले लक्ष

। पिंपरी-चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तांच्या हद्दीमध्ये सायबर क्राईमच्या घटनांनी लक्ष वेधून घेतलं आहे. २०२४ वर्षामध्ये तब्बल ४२९ करोड रुपयांचा गंडा घालण्यात आला आहे. ३७ हजार फसवणुकीच्या घटना घडल्या आहेत. फसवणुकीच्या घटनांमध्ये बहुतांश उच्चशिक्षित तरुण सायबर गुन्हेगारांच्या हाताला लागले आहेत. हे वर्ष सरत असताना सायबर गुन्हेगारी आगामी काळात आव्हानात्मक ठरणारी दिसत आहे.**



सध्या सोशल मीडियाचं जग आहे. प्रत्येक गोष्ट जवळ असावी असं प्रत्येक व्यक्तीला वाटत आहे. मोबाईल द्वारे अख्ख जग आपल्या जवळ आहे. हे सांगायची गरज नाही. पण याच मोबाईलच्या वापरामुळे सायबर गुन्हेगारीमध्ये मोठी वाढ झाली आहे. सायबर गुन्हेगारांच्या जाळ्यात सर्वसामान्य आणि उच्च शिक्षित व्यक्ती अलगद अडकत आहेत. सध्या डिजिटल अरेस्टची मोठी चर्चा सुरू आहे. यावर सरकारने पाऊल देखील उचललं आहे. तुम्ही तुमच्या मित्राला फोन लावल्यानंतर हॅलो ट्युन्समध्ये तुम्ही घाबरून न जाण्याच आवाहन केलं जात आहे. याआधी असं कधीही घडलेलं नाही. शेअर ट्रेडिंग, डिजिटल अरेस्ट, ओटीपी शेअयरिंग, मोबाईल लिंक, व्हाट्सअप लिंक, टेलिग्राम लिंक, परदेशातून गिफ्टचं आल्याचं आमिष दाखवून अनेकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचं उघड झालेलं आहे.

पिंपरी- चिंचवडमध्ये २०२४ या वर्षात तब्बल ३७ हजार सायबर गुन्हेगारी बाबत ऑनलाईन तक्रारींची नोंद आहे. एकूण ४२९ करोड रुपयांची नागरिकांची फसवणूक झालेली आहे. काही गुन्हेगारांना पकडण्यात पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसांना यश आलेलं आहे. बहुतांश प्रकरणांमध्ये आरोपी अद्यापही फरार आहेत. त्यांच्यापर्यंत पोलीस पोहोचू शकलेले नाहीत. अपग्रेड होत चाललेली टेक्नॉलॉजी आणि सायबर पोलिसांवर असलेले बंधन यामुळे पोलीस आरोपींपर्यंत पोहोचण्यात अपयशी ठरत आहेत. यासंदर्भात महाराष्ट्र प्रशासनाने देखील ठोस पावलं उचलण्याची गरज आहे. हे काम केवळ प्रशासनाच आणि पोलिसांचं नाही. सर्वसामान्य नागरिकांनी देखील आपला मोबाईल आणि सोशल मीडिया हाताळत असताना सावध राहणं तितकंच गरजेचं आहे. मोबाईलवर आलेली एखादी लिंक, शेअर ट्रेडिंग संदर्भातील असलेली जाहिरात किंवा ओटीपी संदर्भात आलेला मॅसेज, फोन यामुळे तुमचं बँक खाते रिकाम होऊ शकतं. हे अनेकदा सिद्ध झालेलं आहे. अशावेळी नागरिकांनी त्यावर क्लिक न करता किंवा त्यांना प्रतिसाद न देता सावधगिरी बाळगता येऊ शकते अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांनी दिली आहे.


### सर्वसामान्य नागरिकांनी सावध रहाणे गरजेचे

सायबर गुन्हेगारी मध्ये तब्बल ४२९ करोड रुपयांची फसवणूक ही खूप मोठी बाब असल्याचे देखील त्यांनी यावेळी अधोरेखित केलं. डिजिटल अरेस्ट सारख्या सायबर गुन्हेगारी संबंधित सर्वसामान्य आणि उच्चशिक्षित व्यक्तींनी सावध राहणं गरजेचं आहे. वेळोवेळी पोलिसांना माहिती द्यावी किंवा ऑनलाईन तक्रार द्यावी असे देखील हिरे यांनी म्हटलं आहे. सायबर गुन्हेगारी कमी करण्यासाठी नागरिकांनी पुढाकार घेणे फार गरजेचे आहे. कारण चोर तुमच्याकडे येत नाही, तर तुम्ही त्याच्याकडे जाता अशी अवस्था सायबर गुन्हेगारीची आहे. हे सर्व पाहिल्यानंतर उच्चशिक्षित आणि सर्वसामान्य नागरिकांनी सावध रहाणे गरजेचे आहे.

# डॉ. मनमोहन सिंग : भारताचं शापित नेतृत्व !



'स्टेट'मेंट
अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक



**देशाचे यशस्वी नेतृत्व करण्यासाठी प्रचंड बुद्धिमत्ता लागते, असे मुळीच नाही. त्यासाठी लागते ती प्रगल्भता, सारासार विचार करण्याची कुवत, आपल्या साथीदारांवर असणारा वकूब आणि सर्वसामान्य परिस्थिती लक्षात घेऊन उचललेले पाऊल किंवा निर्णय ! एखाद्या विषयात प्रचंड हुशारी हा यशस्वी पंतप्रधानाचा निकष होऊ शकत नामाजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचे नुकतेच निधन झाले. ते अत्यंत वाकबगार नेते होते, जगातील सर्वोत्तम अर्थतज्ज्ञ होते, त्यांनी देशाची आर्थिक घडी रुळावर आणली, किंबहुना, आत्ता भारत आर्थिक आघाडीवर ज्या जोमाने वाटचाल करीत आहे, त्याचा पाया डॉक्टर साहेबांनी सुमारे 30 वर्षांपूर्वी रचला, हे मान्यच करावे लागेल !**

एखाद्या नेत्याच्या निधनानंतर त्याच्या कमजोर गोष्टींवर बोट ठेवणे योग्य नाही, हे सुद्धा मान्य ! पण, त्यांच्या निधनानंतर त्यांच्या चुकीच्या निर्णयांवर किंवा चुकीच्या कृतींवर काहीच बोलायचे नाही हा न्याय कुठला ? देशाचे माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांच्या निधनानंतर, 'त्यांना श्रद्धांजली वाहणार नाही,' असे उद्गार शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी काढले होते, त्यांनी आयुष्यात उचललेल्या पावलांवर जबरदस्त टीकाही केली होती. अशी टीका करण्याचे धाडस, किंवा आपला मुद्दा पटवून देण्याची कुवत असावी लागते. म्हणूनच तर डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनानंतर संपूर्ण देशातील पत्रकार, लेखक त्यांच्यावर स्तुतीसुमने उधळत असताना सहज विचार चमकून गेला, की आमच्या या नेत्याने आयुष्यात ज्या चुकीच्या गोष्टी केल्या, किंवा त्या घडत असताना त्याकडे डोळे झाक केली, हे पुढील पिढीला समजायलाच हवे.

## कंठ का दाटून येतोय ?

आपल्या देशात अनेकदा कोल्हेकुईचे राजकारण सुरू असते. एक कोल्हा ओरडायला किंवा रडायला लागला की बाकीच्यांना अचानक उमाळा येतो आणि त्यांचीही रडारड सुरू होते. काही उजव्या विचाराच्या, ढोंगी राष्ट्रभक्तांना सुद्धा अचानक डॉ. मनमोहन सिंग यांच्या निधनामुळे कंठ दाटून आला आहे. अचानक 'मरणान्तानी वैराणी' चा उमाळा फुटला आहे. अशा समस्त कमकुवत, मंद, निरागस, भोळसट विचार करणाऱ्यांसाठी आणि त्यांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्यासाठी या विषयावर प्रकाशझोत टाकण्याची वेळ आली आहे. स्पष्ट लिहिण्यामुळे डॉक्टर साहेबांविषयीच्या आदरामध्ये किंचितही घट झालेली नाही. जगातील सर्वोत्तम अर्थतज्ज्ञ म्हणून आजही ते आमचा आणि माझ्यासारख्या लाखोंचा आदर्शच आहेत, हे पुन्हा एकदा निक्षून सांगावेसे वाटते.

सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे त्या काळात काँग्रेसकडे सत्ता गेली असताना सोनिया गांधी या नेतृत्व करू शकत नव्हत्या, त्यामुळे सर्व समावेशक नाव म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांचे नाव पुढे आले. त्यामुळेच त्यांना 'ॲक्सीडेंटल प्राईम मिनिस्टर' असे म्हटले गेले. याचाच अर्थ ते अपघाताने पंतप्रधान बनले, हे वेगळे सांगायला नको. एवढे महत्त्वाचे पद एखाद्या व्यक्तिकडे एकमताने जाणे हे वेगळे आणि एखाद्या व्यक्तिला त्या पदावर बसवणे वेगळे ! पंतप्रधानपद हे डॉक्टरसाहेबांवर लादले गेल्यामुळे त्यांच्याच पक्षात त्यांच्याबद्दल आदराची भावना मुळीच नव्हती, हे वेळोवेळी त्यांच्याच पक्षातील अनेक नेत्यांनी सिद्ध केले आहे. त्यावेळी काँग्रेसचे क्रमांक दोनचे नेते राहुल गांधी यांचे डॉक्टरसाहेबांशी असलेले वर्तन नेहमीच असभ्यपणाचे आणि निषेधार्हच होते. राहुल गांधींसारख्या अपरिपक्व नेत्याने केवळ आपण गांधी घराण्यातील आहोत म्हणजेच श्रेष्ठ आहोत, हे दाखवण्यासाठी डॉ. मनमोहन सिंग यांचा अपमान करण्याची एकही संधी सोडलेली नव्हती. डॉ. मनमोहन सिंग यांनी केलेल्या आंतरराष्ट्रीय कराराची कागदपत्रे पत्रकार परिषद बोलावून सर्वांसमोर राहुल गांधी यांनी टराटरा फाडली होती, हे अवघ्या देशाने दूरदर्शनवर पाहिले आहे.

आज म्हणूनच असे म्हणण्याची वेळ आली आहे, की 'मरणान्तानी वैराणी' वगैरे सर्वसामान्य माणसांमध्ये ठीक असतं. पण राष्ट्राचा विचार करताना हा नियम बाजूलाच ठेवावा लागतो. आपण कशाच्या आधारावर ठरवतोय, की हा मनुष्य देशभक्त होता आणि याने देशाची सेवा केली? दुर्दैवाने असे म्हणावे लागते की, डॉ. मनमोहन सिंग यांनी आयुष्यभर फक्त गांधी-नेहरु घराण्याची सेवा केली. एकेक उदाहरणे चाळून पाहा म्हणजे तथ्य बाहेर येईल.

## उदाहरणे तर किती द्यायची ?

डॉक्टर साहेबांनी, 'शर्म अल् शेख' या ठिकाणी भारताची मान शरमेनं खाली जाईल, असं कृत्य केलं. भारत बलुचिस्तानमध्ये ऑपरेशन्स करत आहे, हे अधिकृतरीत्या बोलून आपल्या बुद्धिमत्तेचा वापर अत्यंत चुकीच्या ठिकाणी केला आणि पंतप्रधानपदाची शपथ घेताना गोपनीयतेची शपथ घ्यावी लागते तिला हरताळ फासला, हे आठवत असेलच. त्यांच्याच काळात उपराष्ट्रपती हामिद अन्सारी यांनी इराणमध्ये कार्यरत असलेल्या भारतीय गुप्तहेरांची यादी इराणला दिली. इराणने ताबडतोब कारवाई करुन त्या गुप्तहेरांचा सफाया केला, हा इतिहास सुद्धा ताजा आहे. लक्षात घ्या, देशाचे हित सांभाळण्यासाठी ज्यांची नियुक्ती झाली, त्यांनी एका रात्रीतच इराणसारख्या देशातील आपले 'डीप ॲसेट्स' संपवून टाकले. आजही माजी नौदल कमांडर कुलभूषण जाधव पाकिस्तानच्या कैदेत आहेत, त्याला भारतात आणण्याचा प्रयत्न सुद्धा आज फोल ठरत आहे, ती देणगी सुद्धा यांचीच !

डॉक्टर साहेब पंतप्रधान असताना उपराष्ट्रपतींचं हे कृत्य म्हणजे खरंतर देशद्रोहाचा मामला असून त्यांच्यावर महाभियोग चालवायला हवा होता, त्यांना पदमुक्त करुन कैदेत टाकायला हवं होतं. पण, यापैकी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी काहीच केलं नाही, केवढे हे लांगुनचालन ! देशद्रोह्याला पाठीशी घालण्याचा करंटेपणा त्या काळात आपल्या पंतप्रधानांनी केला होता, हे लक्षात घ्या.

आपल्या देशाच्या साधनसंपत्तीवर पहिला हक्क अल्पसंख्यांचा आहे, असलं भयंकर विधान डॉ. मनमोहन सिंग नावाच्या नेत्यानं केलं होतं, त्याची फळं आपण आज देखील भोगत आहोत, एवढी क्रूर थट्टा त्यांनी देशाची करून ठेवली आहे. यांच्याच काळात देशाची आर्थिक राजधानी मुंबईवर भयंकर दहशतवादी हल्ला झाला होता. त्या आठवणीने सुद्धा आज थरकाप उडत आहे. त्या हल्ल्याचे 'मास्टर माईंड' पाकिस्तानात होते, असं जरी आपण म्हणत असलो, तरी भारतीय संरक्षण क्षेत्रातले तज्ज्ञ म्हणतात, की त्यात तत्कालीन डॉ. मनमोहन सिंग सरकार आणि प्रशासनात असलेली बडी धेंडं देखील त्या हल्ल्यात सहभागी होती. नंतरच्या काळात त्यावर लेखच्या लेख आणि पुस्तकेच्या पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

देशाचं नाक कापणारा २६/११ चा हल्ला होऊ देणं आणि झाल्यावर तो ज्या पद्धतीनं हाताळला, त्यातून या माणसाचं ढिसाळ नेतृत्व आणि शून्य कर्तृत्व लख्खपणे चव्हाट्यावर आलं आहे. डॉ. मनमोहन सिंग सरकार हे अनेक आर्थिक घोटाळ्यांनी बरबटलेलं सरकार होतं. पंतप्रधानांचा कसलाच धाक, वचक, वकूब न राहिल्यामुळे त्यांच्या वरिष्ठ नेतृत्वापासून खालपर्यंत जो तो मनमानी कारभार करत होता, शक्य आहे, त्या ठिकाणी हात मारत होता, देशाची मालमत्ता खासगी असल्याप्रमाणं दरोडे टाकत होता.

## मुलगी सोरोस संघटनेत सक्रिय

डॉ. मनमोहन सिंग यांची मुलगी डीपस्टेट सोरोसच्या संघटनेत काम करते, यात आश्चर्य वाटण्यासारखं काहीच नाही. देशाची सेवा या माणसानं आणि त्याच्या परिवारानं कधीच केलेली नाही. सोनेरी वर्खाखाली सडलेलं अन्न असावं, सडका मेंदू असावा अशी ही गोष्ट आहे. ज्या गोष्टीला आपल्या देशात अतिशय मानलं जातं किंवा महत्त्व असतं, त्यादेशसेवेच्या आणि सभ्यपणाच्या मुखवट्याआड लपलेला राष्ट्रहिताला नख लावणारा भेसूर चेहरा, हीच डॉ. मनमोहन सिंग यांची खरी ओळख आहे, हे लक्षात घ्या आणि इतिहासाचं पुन्हा अवलोकन करा. त्यांचं निधन झालं, म्हणून या भयावह गोष्टी आणि देशद्रोहीपणाचे मुद्दे विसरुन जाता कामा नयेत, त्यांची पुन्हा शहानिशा करायला हवी.

## देशसेवा, देशप्रेम हेच सर्वश्रेष्ठ

राष्ट्रहिताचा विचार करताना कुणी खरोखर राष्ट्रसेवा केली आणि कोण बांडगुळासारखे राष्ट्रहितरस शोषत राहिलं, याचं भान सतत ठेवायलाच हवं. तुम्ही त्यांना अर्थतज्ज्ञ म्हणा, उच्चपदस्थ म्हणा, उच्चशिक्षित म्हणा, हुशार म्हणा, वाट्टेल ते म्हणा, पण त्यांनी देशसेवा केली, हे मात्र दहा हजार टक्के अमान्यच करायला हवं. मनुष्याच्या निधनानंतर उदो उदो करण्याचे उद्योग सध्या सुरू आहेत त्याचा पूर्णपणे निषेधच करायला हवा. आपल्या देशातील देशप्रेमी आणि सर्वसामान्य नागरिकांना अशा भयंकर आंतरराष्ट्रीय षडयंत्राबाबतीत काहीच माहीत नसतं आणि ज्यांना माहित असतं ते बेधडकपणे बोलणं अथवा लिहिणं टाळतात, पण जेव्हा भारतमातेच्या रक्षणार्थ सैनिक, गुप्तहेर व नागरिक सुध्दा बळी पडतात, तेव्हा अशा गोष्टी समाजासमोर येणे तितकेच आवश्यक आहे. अन्यथा,अशा ऐतिहासिक घटना गाडून टाकून तोच पक्ष शिरजोर होऊन निर्ल्लजपणे काहीच घडलं नाही, अशा अविर्भावात वावरून आपले नीच राजकीय डावपेच करत राहतो. डॉ. मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहताना हेच त्यांचे स्तुतीपाठक नक्राश्रू ढाळतात आणि डॉ. मनमोहन सिंग यांना 'भारतरत्न' द्या अशी मागणी पुढे आणतात. पण, या नतद्रष्टांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर किंवा स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याविषयी ओकलेली गरळ देशप्रेमी लोक कधीच विसरत नाहीत, हे पण लक्षात घ्या ! ■■■

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# अन्यथा आमच्या सरकारवर ठपका पडेल!

## गोगावलेंचं बीडच्या सरपंच हत्या प्रकरणावरून मोठं विधान

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची काही दिवसांपूर्वी हत्या झाल्याची धक्कादायक घटना घडली. या घटनेनंतर संपूर्ण महाराष्ट्रात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेप्रकरणी सर्वच क्षेत्रातून संताप व्यक्त करण्यात येत आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात काही आरोपींना पोलिसांनी अटक केलं आहे.**



### भरत गोगावले काय म्हणाले?

दरम्यान, मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणात वाल्मिक कराड यांचाही सहभाग असल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे. तसेच वाल्मिक कराड यांना मंत्री धनंजय मुंडे हे वाचवत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. त्यामुळे यावरून बीड जिल्ह्यात चांगलंच राजकार तापलं आहे. तसेच विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करताना असंही म्हटलं आहे की, धनंजय मुंडेंच्या आशीर्वादाने वाल्मिक कराडला संरक्षण मिळतं आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला आरोपी करण्यात यावं आणि धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणी महाविकास आघाडीकडून करण्यात आली आहे.

मात्र, अद्यापही या प्रकरणातील काही आरोपी फरार आहेत. या फरार आरोपींवर तात्काळ अटकेची कारवाई करण्यात यावी आणि संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात विविध पक्षाचे नेते, आमदार आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी मोर्चाला संबोधित करताना विविध नेत्यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला. तसेच या प्रकरणात तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, या घटनेवर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री भरत गोगावले यांनी देखील मोठं भाष्य केलं आहे. "मस्साजोगच्या सरपंच हत्या प्रकरणी कारवाई झाली पाहिजे. या घटनेत जे कोणी आरोपी असतील त्यांना कडक शासन झालंच पाहिजे, अन्यथा आमच्या सरकावर तो ठपका पडेल", असं भरत गोगावले यांनी म्हटलं आहे.बीडमधील सरपंच हत्या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मंत्री भरत गोगावले म्हणाले, "बीड जिल्ह्यात जी हत्येची घटना घडली ती अंत्यत दुर्देवी आहे. ही हत्या अत्यंत निर्घृण पद्धतीने करण्यात आलेली आहे. या घटनेत जे-जे आरोपी असतील त्याला शासन व्हायला पाहिजे. आमचं महायुतीचं सरकार जर हे करू शकलं नाही तर तो ठपका आमच्यावर पडेल", असं मंत्री भरत गोगावले यांनी म्हटलं आहे. दरम्यान, महाविकास आघाडीच्या नेत्यानंतर आता शिवसेना शिंदे गटाचे मंत्रीही बीडच्या प्रकरणावरून आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे. दरम्यान, मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणात वाल्मिक कराड यांचाही सहभाग असल्याचा गंभीर आरोप महाविकास आघाडीच्या नेत्यांकडून करण्यात येत आहे. तसेच वाल्मिक कराड यांना मंत्री धनंजय मुंडे हे वाचवत असल्याचा आरोपही करण्यात येत आहे. त्यामुळे यावरून बीड जिल्ह्यात चांगलंच राजकार तापलं आहे. तसेच विरोधकांनी धनंजय मुंडे यांच्यावर आरोप करताना असंही म्हटलं आहे की, धनंजय मुंडेंच्या आशीर्वादाने वाल्मिक कराडला संरक्षण मिळतं आहे. त्यामुळे संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात वाल्मिक कराडला आरोपी करण्यात यावं आणि धनंजय मुंडे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्यात यावी, अशी मागणी महाविकास आघाडीकडून करण्यात आली आहे. मात्र, धनंजय मुंडेंच्या यांच्या राजीनाम्यासंदर्भातील विरोधकांच्या मागणीवर राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री हसन मुश्रीफ यांनी देखील भाष्य केलं. हसन मुश्रीफ यांनी म्हटलं की, जोपर्यंत कोणी दोषी आढळत नाही तोपर्यंत राजीनामा देण्याची आवश्यकता नाही", असं त्यांनी म्हटलं होतं. मात्र, अद्यापही या प्रकरणातील काही आरोपी फरार आहेत.

या फरार आरोपींवर तात्काळ अटकेची कारवाई करण्यात यावी आणि संतोष देशमुख यांच्या हत्येच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी बीड जिल्ह्यात सर्वपक्षीय मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चात विविध पक्षाचे नेते, आमदार आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी मोर्चाला संबोधित करताना विविध नेत्यांनी या घटनेचा निषेध व्यक्त केला. तसेच या प्रकरणात तात्काळ कारवाई करण्याची मागणी केली. दरम्यान, या घटनेवर आता शिवसेना शिंदे गटाचे नेते तथा मंत्री भरत गोगावले यांनी देखील मोठं भाष्य केलं आहे. "मस्साजोगच्या सरपंच हत्या प्रकरणी कारवाई झाली पाहिजे. या घटनेत जे कोणी आरोपी असतील त्यांना कडक शासन झालंच पाहिजे, अन्यथा आमच्या सरकावर तो ठपका पडेल", असं भरत गोगावले यांनी म्हटलं आहे.बीडमधील सरपंच हत्या प्रकरणावर प्रतिक्रिया देताना मंत्री भरत गोगावले म्हणाले, "बीड जिल्ह्यात जी हत्येची घटना घडली ती अंत्यत दुर्देवी आहे. ही हत्या अत्यंत निर्घृण पद्धतीने करण्यात आलेली आहे. या घटनेत जे-जे आरोपी असतील त्याला शासन व्हायला पाहिजे. आमचं महायुतीचं सरकार जर हे करू शकलं नाही तर तो ठपका आमच्यावर पडेल", असं मंत्री भरत गोगावले यांनी म्हटलं आहे. दरम्यान, महाविकास आघाडीच्या नेत्यानंतर आता शिवसेना शिंदे गटाचे मंत्रीही बीडच्या प्रकरणावरून आक्रमक झाल्याचं पाहायला मिळत आहे.

# प्राजक्ता माळीने घेतली फडणवीसांची भेट

## प्राजक्ताने मुंबईत पत्रकार परिषद घेत आपली भूमिका केली स्पष्ट

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बीडच्या मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून राजकीय वर्तुळात सध्या आरोप-प्रत्यारोप होत आहेत. या दरम्यान भाजपा आमदार सुरेश धस यांनी अभिनेत्री प्राजक्ता माळी हिचे नाव घेत केलेल्या वक्तव्याचीही चर्चा आहे. या पार्श्वभूमीवर अभिनेत्री प्राजक्ता माळीने मुंबईत पत्रकार परिषद घेत आपली भूमिका स्पष्ट केली.**

तसंच, धस यांनी केलेल्या वक्तव्याचा समाचारही घेतला. आपपासांतील राजकारणासाठी महिला कलाकारांच्या नावाचा गैरवापर होता कामा नये, अशा शब्दांत भूमिका स्पष्ट करणाऱ्या प्राजक्ताने धस यांनी आपली जाहीर माफी मागावी, अशी मागणी केली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणावरून सुरू असलेल्या वादंगादरम्यान आमदार सुरेश धस यांनी हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्रींसह माळीचेही नाव घेत टिप्पणी केली होती. दरम्यान, आज तिने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन तक्रारीचे निवेदन सादर केले. मुख्यमंत्री कार्यालयामार्फत ही माहिती देण्यात आली. एक्स



खात्यावरून फोटो पोस्ट करून म्हटलंय की, "अभिनेत्री प्राजक्ता माळी यांनी आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सागर निवासस्थानी भेट घेतली आणि निवेदन दिले. त्यांच्या सन्मानाला बाधा येईल, असे कुठलेही कृत्य खपवून घेणार नाही आणि त्यावर कारवाई केली जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना आश्वस्त केले. त्यांच्याविरोधात यूट्यूबवर काही लोक आक्षेपार्ह व्हिडिओ प्रसारित करतात, अशीही तक्रार त्यांनी यावेळी केली. त्या सर्वांवर सुद्धा कारवाई करण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना दिले.कलाकार म्हणून वेगवेगळ्या शहरांत जाणं, प्रेक्षकांचं मनोरंजन करणं हे कलाकारांचं काम आहे. परळीच नाही, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात जाऊन मी काम केलं आहे. यापुढेही काम करत राहणार.

### पत्रकार परिषदेत काय म्हटलं?

याआधीही अनेक राजकीय नेत्यांबरोबर, मान्यवरांबरोबर फोटो आहेत. मग त्या फोटोचा संदर्भ घेऊन तुम्ही कुणाहीबरोबर असंच नाव जोडणार का? हे एक महिला कलाकार म्हणून मला अतिशय निंदनीय वाटतं. महाराष्ट्रातल्या राजकारण्यांना हे कृत्य शोभत नाही. ते बोलले ते इतकं कुत्सित आहे. तुम्ही फक्त महिला कलाकारांच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवत नाही आहात. महिलांच्या कर्तृत्वावरही प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहात. कुठल्या राजकारण्यांच्या कुबड्यांशिवाय एखादी महिला स्वकर्तृत्वावर यशस्वी होऊ शकत नाही का? अशी टिप्पणी करून तुम्ही स्वतःची मानसिकता दाखवत आहात.

# सहा विमान अपघात; 234 जणांचा मृत्यू!

## विमानाची भिंतीला टक्कर होताच मोठा स्फोट

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बँकॉकहून येणारे जेजू एअरचे विमान रविवारी दक्षिण कोरियातील मुआन विमानतळावर कोसळले. न्यूज एजन्सी एपीने दिलेल्या माहितीनुसार, विमानात 175 प्रवासी आणि 6 क्रू मेंबर्ससह 181 लोक होते. आतापर्यंत 177 मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत. 2 जणांना जिवंत बाहेर काढण्यात आल्याची माहिती बचाव पथकाने दिली आहे. उर्वरित प्रवाशांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. मृतांमध्ये 82 पुरुष आणि 84 महिलांचा समावेश आहे. 11 मृतदेहांची ओळख अद्याप पटलेली नाही.**



हा अपघात भारतीय वेळेनुसार पहाटे ५:३७ वाजता (स्थानिक वेळेनुसार सकाळी ९:०७) झाला. हे विमान मुआन आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणार होते. त्याच वेळी लँडिंग गियरमध्ये खराबी आढळून आली. त्यामुळे त्याची चाके उघडली नाहीत. चाके न उघडल्याने विमानाचे इमर्जन्सी बेली लँडिंग करण्यात आले. यामध्ये विमानाचे शरीर थेट धावपट्टीवर आदळते. यादरम्यान विमान धावपट्टीवर घसरले आणि विमानतळाच्या सीमा भिंतीला धडकले. विमानाची टक्कर होताच मोठा स्फोट झाला आणि त्याचे रूपांतर आगीच्या गोळ्यात झाले. अपघातानंतर विमानतळावरील वाहतूक बंद करण्यात आली. सर्व स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली. रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, कंट्रोल टॉवरवरून विमानाला पक्षी धडकल्याचा इशारा देण्यात आला होता. जेजू एअरलाइन्सचे विमान कोसळले ते अमेरिकन कंपनी बोईंगचे ७३७-८०० विमान होते. विमानाने दोनदा विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न केला. लँडिंग गिअर न उघडल्याने विमान पहिल्यांदा उतरू शकले नाही. यानंतर विमानाने विमानतळाला प्रदक्षिणा घातली. दुसऱ्यांदा वैमानिकाने लँडिंग गिअरशिवाय विमान बेली लँड करण्याचा निर्णय घेतला. अनेक मीडिया रिपोर्ट्सनुसार, पक्षी विमानाच्या पंखाला आदळल्याचा दावा केला जात आहे. त्यामुळे लँडिंग गिअर खराब झाले आणि लँडिंग करताना उघडता आले नाही. मुआन विमानतळाच्या अग्निशमन अधिकाऱ्याने वृत्तसंस्था रॉयटर्सशी बोलताना सांगितले की, विमानातील आग आटोक्यात आणण्यात आली आहे. मात्र, आग विझवण्यासाठी 43 मिनिटे लागली. अपघातस्थळी सध्या बचावकार्य सुरू आहे. बहुतांश लोक विमानाच्या मागील बाजूस होते, त्यांना तेथून बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. विमानात बसलेल्या प्रवाशांमध्ये 173 दक्षिण कोरियाचे आणि 2 थायलंडचे नागरिक होते. मीडिया रिपोर्ट्सनुसार, वाचलेले दोघेही चालक दलाचे सदस्य आहेत. जेजू एअरचे सीईओ किम ई-बे यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून लोकांची माफी मागितली आहे. अपघातामागचे कारण काहीही असो, मी सीईओ म्हणून संपूर्ण जबाबदारी घेतो, क्विन म्हणाले. मदत आणि बचावासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असल्याचे कंपनीने म्हटले आहे. कंपनीच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, हे विमान गेल्या 15 वर्षांपासून कार्यरत होते. हे विमान यापूर्वी कधीही कोसळलेले नाही. सध्या पक्ष्यांच्या धडकेने लँडिंग गिअरमध्ये बिघाड होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. हा अपघात भारतीय वेळेनुसार पहाटे ५:३७ वाजता (स्थानिक वेळेनुसार सकाळी ९:०७) झाला. हे विमान मुआन आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरणार होते. त्याच वेळी लँडिंग गियरमध्ये खराबी आढळून आली. त्यामुळे त्याची चाके उघडली नाहीत. चाके न उघडल्याने विमानाचे इमर्जन्सी बेली लँडिंग करण्यात आले. यामध्ये विमानाचे शरीर थेट धावपट्टीवर आदळते. यादरम्यान विमान धावपट्टीवर घसरले आणि विमानतळाच्या सीमा भिंतीला धडकले. विमानाची टक्कर होताच मोठा स्फोट झाला आणि त्याचे रूपांतर आगीच्या गोळ्यात झाले. अपघातानंतर विमानतळावरील वाहतूक बंद करण्यात आली.

### विमान धावपट्टीवरून घसरले

कॅनडामध्ये शनिवारी रात्री (भारतीय वेळेनुसार रविवारी सकाळी 8 वाजता) हॅलिफॅक्स विमानतळावर उतरताना एक प्रवासी विमान घसरले. लँडिंग करताना विमानाचा एक भाग धावपट्टीच्या दिशेने झुकला. त्यामुळे विमानाच्या पंखाला आग लागली. मात्र, कोणतीही जीवित वा वित्तहानी झालेली नाही. सर्व स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणे रद्द करण्यात आली. रॉयटर्सने दिलेल्या माहितीनुसार, कंट्रोल टॉवरवरून विमानाला पक्षी धडकल्याचा इशारा देण्यात आला होता. जेजू एअरलाइन्सचे विमान कोसळले ते अमेरिकन कंपनी बोईंगचे ७३७-८०० विमान होते. विमानाने दोनदा विमानतळावर उतरण्याचा प्रयत्न केला. लँडिंग गिअर न उघडल्याने विमान पहिल्यांदा उतरू शकले नाही. यानंतर विमानाने विमानतळाला प्रदक्षिणा घातली. दुसऱ्यांदा वैमानिकाने लँडिंग गिअरशिवाय विमान बेली लँड करण्याचा निर्णय घेतला. अनेक मीडिया रिपोर्ट्सनुसार, पक्षी विमानाच्या पंखाला आदळल्याचा दावा केला जात आहे.

# काश्मिरात हिमवृष्टीने जनजीवन विस्कळीत

## अधिकांश भागात हिमवृष्टीमुळे विमान आणि रेल्वे सेवाही ठप्प

| नवी दिल्ली |
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**काश्मीर खोऱ्यातील अधिकांश भागात हिमवृष्टी झाल्याने जनजीवन विस्कळीत झाले. अधिकांश भागात हिमवृष्टीमुळे विमान आणि रेल्वेसेवाही ठप्प झाली होती तर जम्मू-श्रीनगर महामार्गही बंद झाला. खोऱ्यात मोसमातील पहिली हिमवृष्टी झाली होती.**



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, श्रीनगर व प्रसिद्ध पर्यटनस्थळ सोनमर्गमध्ये प्रत्येकी आठ इंच तर गांदरबलमध्ये सात, श्रीनगर-लेह राष्ट्रीय महामार्गावरील जोजीला येथे १५ तर अनंतनाग जिल्ह्यातील मैदानी भागात १७ इंच हिमवृष्टी झाल्याची नोंद झाली. उत्तराखंडमध्ये मैदानी भागासह शिखरांवरही हिमवृष्टी आणि पावसामुळे राज्यातील थंडीत वाढ झाली आहे. यासोबतच हिमालयीन मंदिरांकडे जाणारे महामार्गही अनेक ठिकाणी बंद राहिले. औली, हर्षिल, हेमकुंड साहिब, चोपता, दयारा, लोखंडी, सुक्की टॉप, मुनस्यारी आणि पिथौरागढवर बर्फाची चादर पसरल्याचे दृश्य आहे. श्रीनगर-सोनमर्ग राष्ट्रीय महामार्गावरील गुंड येथील स्थानिक नागरिकांनी हिमवृष्टीत अडकलेल्या पर्यटकांना मशिदीत आश्रय दिला. पंजाबच्या पर्यटकांचे वाहन हिमवृष्टीमुळे अडकून पडले होते. त्या वेळी जवळपास एकही हॉटेल अथवा राहण्याची व्यवस्थाही नव्हती. याची माहिती मिळताच स्थानिकांनी जामिया मशिदीचे दार पर्यटकांसाठी उघडले. त्यामुळे पर्यटकांना रात्रभर येथे आश्रय घेता आला. नागरिकांनी केलेल्या आदरातिथ्यामुळे सर्व पर्यटक भारावले होते. दरम्यान, 'हा सर्वोत्तम उपाय होता.

### परीक्षा पुढे ढकलल्या

हिमवृष्टीमुळे जम्मू-श्रीनगर राष्ट्रीय महामार्ग बंद करण्यात आला तर रेल्वे रुळांवर मोठ्या प्रमाणात बर्फ साचल्यामुळे बनिहाल – बारामुला मार्गावर रेल्वे वाहतूकही ठप्प झाली होती. हिमवृष्टीमुळे श्रीनगर विमानतळावरील धावपट्टीवर बर्फ साचल्यामुळे सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली. यासोबतच खोऱ्यातील अनेक भागांमध्ये वीजपुरवठाही खंडित झाला होता. राज्यातील स्थितीचा मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनीही आढावा घेतला. दरम्यान काश्मीर विद्यापीठानेही सर्व परीक्षा पुढे ढकलल्या आहेत.

# नव्या वर्षात सिनेसृष्टीत दिसणार यंग ब्रिगेड

शाहरुख खान, सलमान खान यांसारख्या दिग्गजांचे सिनेमे आजही बॉक्स ऑफिसवर अनेक विक्रम करून बक्कळ कमाई करतात. हे दिग्गज गेल्या ३० वर्षांपेक्षा जास्त काळापासून बॉलीवूडमध्ये असून त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकत आहेत. हे सर्व स्टार्स आज त्यांच्या पन्नाशीत असून त्यांचे स्टारडम आजही टिकून आहे. या पिढीतील स्टार्सचा बॉलीवूडमध्ये प्रभाव असला तरी बॉलीवूडमध्ये आता नवी पिढी येत आहे. यात शाहरुख आणि सलमानच्या पिढीतील स्टार्सची मुले असणार आहेत.२०२५ मध्ये, बॉलीवूडमध्ये नव्या पिढीचा प्रभाव दिसू लागणार आहे. आर्यन खान, इब्राहिम खान, राशा थडानी, शनाया कपूर आणि अमन देवगण यासारखी तरुण पिढी मनोरंजन क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करण्यासाठी सज्ज झाली आहे. त्याचबरोबर नितांशी गोयल, अभय वर्मा आणि लक्ष लालवानी हे तरुण कलाकार सिनेमाला नवी दिशा देण्यासाठी पुढे येत आहेत.२०२५ हे वर्ष बॉलीवूडसाठी नव्या सुरुवातीचे संकेत देते आहे. सलमान खान, शाहरुख खान, रणवीर सिंग, रणबीर कपूर, कार्तिक आर्यन, राजकुमार राव, सिद्धार्थ मल्होत्रा यांसारख्या कलाकारांनी बॉक्स ऑफिसवर चांगली कामगिरी केली. मात्र, आता बॉलीवूडची नवी पिढी नव्या जोमाने आपले स्थान निर्माण करण्यासाठी तयार झाली आहे.शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान त्याच्या 'स्टारडम' या वेब सीरिजमधून दिग्दर्शन क्षेत्रात पदार्पण करतोय. सैफ अली खानचा मुलगा इब्राहिम अली खान करण जोहरच्या बॅनरखाली अभिनय क्षेत्रात पाऊल टाकणार आहे.

# प्रशांत दामलेंनी घंटा वाजवून केली सुरुवात

नाट्य पंढरी सांगलीमध्ये यंदाच्या शंभराव्या नाट्य संमेलनाची मुहूर्तमेढ (AKHIL BHARTIYA MARATHI NATYA SAMMELAN) रोवली जात आहे. सांगलीतील विष्णुदास भावे नाट्यगृहात मुहूर्तमेढ सोहळा पार पडत आहे. मावळते अध्यक्ष प्रेमानंद गजवी, नियोजित अध्यक्ष जब्बार पटेल आणि सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार,यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा संपन्न होत आहे. प्रशांत दामले यांच्या हस्ते घंटा वाजवून संमेलन कार्यक्रमाला सुरुवात झाली आहे. यंदाचे नाट्यसंमेलनाचे शंभरावे वर्ष असल्याने ते ठिकठिकाणी साजरे करण्यात येणार आहे. पुणे, पिंपरी चिंचवड, अहमदनगर, बीड, मुंबई इथेही संमेलन होणार असून समारोप रत्नागिरी या ठिकाणी होणार आहे. तत्पूर्वी नाट्य पंढरी म्हणून ओळख असणाऱ्या सांगलीतून या संमेलनाच्या शताब्दी वर्षाचा मुहूर्तमेढ रोवला जातोय. या निमित्ताने दोन दिवस सांगलीत विविध सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार आहेत. नाट्यसंमेलनाच्या मुहूर्तमेढ कार्यक्रमादरम्यान नाट्य परिषदेचे अध्यक्ष प्रशांत दामले म्हणाले,"गेली 40 वर्षे मी पाठ केलेले संवाद बोलत आहे. आज नाट्यसंमेलनाच्या माध्यमातून असं पहिल्यांदाच बोलत आहे. मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, सांस्कृतिक मंत्री, उदय सामंत, शरद पवार ही सर्व मंडळी नाट्यवेडी आहेत. ही मंडळी नेहमीच आमच्या पाठिशी आहेत. आम्हाला काय हवंय आणि काय नकोय हे त्यांना माहिती आहे".

# अंधश्रद्धेचे 'पंचक' सोडवणार

बॉलिवूडची 'धक धक गर्ल' माधुरी दीक्षित आणि तिचे पती डॉ. श्रीराम नेने निर्मित 'पंचक' हा मराठी सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज आहे. या निमित्ताने या जोडप्याने एबीपी माझाच्या 'माझा कट्टा' या कार्यक्रमात हजेरी लावली. आपल्या माणसांसाठी, त्यांच्याच जवळच्या विषयाच्या माध्यमातून एखादी कलाकृती पोहोचावी, या विचाराने अभिनेत्रीने 'पंचक' सिनेमाच्या निर्मितीचा घाट घातला आहे. माधुरी दीक्षित आणि डॉ. श्रीराम नेने निर्मित '15 ऑगस्ट' हा सिनेमा कोरोनाकाळात ओटीटीवर रिलीज झाला होता. या सिनेमाला प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद मिळाला. आता 'पंचक' या दुसऱ्या सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन करण्यासाठी ते सज्ज आहेत. हा सिनेमा 5 जानेवारी 2023 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होत आहे. माधुरीसमोर विविध धाटणीचे, वेगवेगळ्या विषयांवर भाष्य करणारे सिनेमे होते. पण तरीही तिला 'पंचक' या सिनेमाची कथा भावली. या कथा निवडीबद्दल बोलताना माधुरी म्हणाली,"15 ऑगस्ट'ला प्रेक्षकांचा सकारात्मक प्रतिसाद मिळाला. त्यानंतर मी एका चांगल्या संहितेचा शोध घेत होते.



# अभिनेते नासर यांनी मुलाची स्मृती

दाक्षिणात्य अभिनेते नासर हे त्यांच्या विविधांगी भूमिकेसाठी ओळखले जातात. त्यांनी दाक्षिणात्य सिनेमासह बॉलीवूडमध्येही काम केले आहे. नुकतच त्यांनी एका मुलाखतीत त्यांच्या आयुष्यात आलेल्या कठीण प्रसंग सांगितला. अक्षय कुमारच्या 'राऊडी राठोड' सिनेमात मुख्य खलनायकाची भूमिका करणारे अभिनेते नासर यांचा मुलगा फैसलचा २०१४ मध्ये एक अपघात झाला होता. या अपघातात तो गंभीर जखमी झाला होता. या अपघातानंतर त्यांच्या मुलाची स्मरणशक्ती पुन्हा येण्यासाठी त्यांनी त्यांच्या मुलाला साऊथच्या प्रसिद्ध अभिनेत्याचे सिनेमे दाखवले होते. ओएमजी पॉडकास्टमधील मुलाखतीत नासर म्हणाले, "त्याचा अपघात झाल्यानंतर तो १४ दिवसांहून अधिक काळ बेशुद्ध होता, कोमामध्ये होता, आणि आम्ही त्याला उपचारासाठी सिंगापूरला देखील नेले. जेव्हा तो प्रथम शुद्धीवर आला, तेव्हा त्याने 'अम्मा' किंवा 'अप्पा' असं न म्हणता, 'विजय' हा पहिला शब्द म्हणाला." असे भावूक होऊन नासर यांनी सांगितले. त्यांनी पुढे स्पष्ट केले की त्यांचा मुलगा विजयचा मोठा चाहता होता. "तो विजयसारखे कपडे घालत, त्याच्या सारखा चालायचा डान्सही त्याच्यासारखा करायचा यामुळे मी त्याला खूप चिडवायचो. तो याकडे दुर्लक्ष करत म्हणायचा की त्याच्या वयात असणारे सर्वच मुलं असे कपडे घालतात."नासर यांनी सांगितले की जेव्हा फैसलने शुद्धीवर येऊन विजयचे नाव घेतले, तेव्हा त्यांना वाटले की तो त्याच्या एखाद्या मित्राचे नाव घेत आहे. ते म्हणाले, "तो त्याच्या मित्राचे नाव घेतोय हे ऐकून आम्हाला वाटले त्याची स्मरणशक्ती गेलेली नाही आम्हाला खूप आनंद झाला. आम्ही त्याच्या मित्राला भेटायला बोलावले. नंतर, माझ्या पत्नी कमिलाला जाणवले की तो काहीतरी वेगळे सांगण्याचा प्रयत्न करतोय. तिने त्याला सुपरस्टार विजयचा फोटो दाखवला, आणि त्याने त्याला ओळखले हे त्याच्या डोळ्यातून दिसले," असे नासर म्हणाले. त्यांनी सांगितले की अपघातानंतर फैसलची स्मरणशक्ती परत यावी यासाठी त्यांनी विजयचे चित्रपट आणि गाणी दाखवायला सुरुवात केली."जेव्हा अभिनेता विजयला याबद्दल समजले, तेव्हा त्याला फैसलला भेटायला यायचे होते. आम्ही त्याला सांगितले की त्याला तसे करण्याची गरज नाही, पण माझ्या मुलाला तो भेटायला नक्की येईल हे त्याने ठरवले होते. त्याप्रमाणे विजय फैसलला अनेक वेळा भेटला आणि त्याने त्याच्याबरोबर वेळ घालवला.

# मलायकाचा विवाहाबाबत मोठा खुलासा

अभिनेत्री मलायका अरोरा (MALAIKA ARORA) सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. अभिनेत्रीने 'झलक दिखला जा 11'च्या (JHALAK DIKHHLA JAA 11) मंचावर दुसऱ्या लग्नाबद्दल मोठी हिंट दिली आहे. या कार्यक्रमातील प्रोमो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे. मलायका अरोरा अरबाज खानसोबत लग्नबंधनात अडकली होती. पण काही कारणाने त्यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर अभिनेता आणि निर्माता असणारा अरबाज सेलिब्रिटी मेकअप आर्टिस्ट शौरा खानसोबत लग्नबंधनात अडकला. अशातच आता अरबाजची पूर्वाश्रमीची पत्नी मलायकानेदेखील दुसरं लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. मलायका सध्या छोट्या पडद्यावरील लोकप्रिय कार्यक्रम 'झलक दिखला जा 11'चं परिक्षण करत आहे. मलायकासह फराह खान, अरशद वारसीदेखील परिक्षकाच्या भूमिकेत आहेत. या कार्यक्रमाच्या नुकत्याच पार पडलेल्या भागात मलायकाने दुसऱ्या लग्नाबद्दल भाष्य केलं आहे. तिच्या या वक्तव्याने चाहत्यांचं लक्ष वेधून घेतलं आहे. 'झलक दिखला जा 11' या कार्यक्रमाचा एक प्रोमो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रोमोमध्ये फराह खान मलायकाला विचारते,"2024 मध्ये तू अभिनेत्री आणि सिंगल पॅरेंट असणार की अभिनेत्री आणि डबल पॅरेंट असणार?". यावर उत्तर देत मलायका म्हणते,"मला पुन्हा कोणालातरी दत्तक घ्यावे लागेल". यावर गौहर खान म्हणते,"तू दुसरं लग्न करणार आहेस का?".

गौहरच्या प्रश्नाचं उत्तर देत मलायका म्हणते,"एखादी चांगली व्यक्ती असेल तर नक्कीच मी 100% लग्न करण्याचा विचार करेल. मला कोणी लग्नसाठी मागणी घातली तर मी पुन्हा संसार थाटेल". मलायकाच्या या वक्तव्यामुळे ती दुसऱ्या लग्नासाठी तयार असल्याचं स्पष्ट दिसत आहे. अरबाज खानसोबत विभक्त झाल्यानंतर मलायकाच्या आयुष्यात अर्जुन कपूरची एन्ट्री झाली. गेल्या अनेक दिवसांपासून अर्जुन आणि मलायका एकमेकांना डेट करत आहेत. अनेकदा दोघांना एकत्र स्पॉट करण्यात आलं आहे. त्यांचे फोटो आणि व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. अर्जुन कपूर काही दिवसांपूर्वी 'कॉफी विथ करण 8' या कार्यक्रमात सहभागी झाला होता. त्यावेळी त्याला मलायका आणि त्याच्या रिलेशनबद्दल प्रश्न विचारण्यात आला. पण दोघे एकत्र असताना आम्ही यावर बोलू असं उत्तर अभिनेत्याने दिलं. अभिनेत्री मलायका अरोरा सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आली आहे. अभिनेत्रीने 'झलक दिखला जा 11'च्या मंचावर दुसऱ्या लग्नाबद्दल मोठी हिंट दिली आहे. या कार्यक्रमातील प्रोमो सध्या सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल होत आहे.

मलायका अरोरा अरबाज खानसोबत लग्नबंधनात अडकली होती. पण काही कारणाने त्यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला.



# रहमत शाहचे ऐतिहासिक द्विशतक!

## खास पराक्रम करणारा रहमत ठरला पहिलाच खेळाडू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अफगाणिस्तान आणि झिम्बाब्वे यांच्यात सुरू असलेल्या कसोटी सामन्यात एक वेगळाच थरार पाहायला मिळत आहे. हा सामना आता अनिर्णितकडे वाटचाल करताना दिसत असला तरी चार दिवसांच्या खेळाबद्दल बोलायचे झाले तर दोन्ही संघांच्या फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली आहे. विशेष म्हणजे या सामन्यात अफगाणिस्तानच्या रहमत शाहने ऐतिहासिक द्विशतक झळकावले आहे.**




शाहची फलंदाजी अफगाणिस्तानसाठी उत्कृष्ट ठरली. अफगाणिस्तानकडून रहमत शाहने २३४ धावांची खेळी साकारली. या डावात रहमतने ४२४ चेंडूंचा सामना केला, ज्यामध्ये त्याने २३ चौकार आणि ३ षटकारही मारले. यासह रहमत अफगाणिस्तानसाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात मोठी खेळी खेळणारा फलंदाज ठरला आहे.रहमत शाहने २०० धावांचा टप्पा गाठताच, कसोटी क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारा तो दुसरा अफगाणिस्तानचा फलंदाज ठरला. यापूर्वी अफगाण संघाचे कसोटी क्रिकेटमधील एकमेव द्विशतक कर्णधार हशमतुल्ला शाहिदीच्या नावावर होते. शाहिदीने २०२१ साली झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद २०० धावा केल्या होत्या. आता रहमत शाह अफगाणिस्तानसाठी कसोटीत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. या सामन्यात फक्त रहमत शाहने नाही तर कर्णधार हशमतुल्ला शाहिदीही झिम्बाब्वेच्या गोलंदाजांसाठी डोकेदुखी ठरला. रहमत शाह बाद झाल्यानंतर शाहिदीने ताकदीने डाव सांभाळला. शाहिदीने आपले शतक पूर्ण केल्यानंतर काही वेळातच अफगाणिस्तानच्या धावसंख्येने चौथ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात ५०० धावांचा टप्पा पार केला. यापूर्वी झिम्बाब्वे संघानेही दमदार प्रदर्शन केले होते. झिम्बाब्वेसाठी कर्णधार क्रेग इर्विनसह तीन फलंदाजांनी पहिल्या डावात शतके झळकावली. क्रेग इर्विनशिवाय सीन विल्यम्सने संघाकडून सर्वाधिक १५४ धावांची खेळी साकारली. या खेळीत त्याने १७४ चेंडूंचा सामना केला. ज्यामध्ये त्याने १० चौकार आणि ३ षटकार मारले. याशिवाय ब्रेन बेनेटने ११० धावांची नाबाद खेळी करत झिम्बाब्वेला विक्रमी धावसंख्येपर्यंत पोहोचवले. विशेषतः रहमत शाहची फलंदाजी अफगाणिस्तानसाठी उत्कृष्ट ठरली. अफगाणिस्तानकडून रहमत शाहने २३४ धावांची खेळी साकारली. या डावात रहमतने ४२४ चेंडूंचा सामना केला, ज्यामध्ये त्याने २३ चौकार आणि ३ षटकारही मारले. यासह रहमत अफगाणिस्तानसाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात मोठी खेळी खेळणारा फलंदाज ठरला आहे.रहमत शाहने २०० धावांचा टप्पा गाठताच, कसोटी क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारा तो दुसरा अफगाणिस्तानचा फलंदाज ठरला. यापूर्वी अफगाण संघाचे कसोटी क्रिकेटमधील एकमेव द्विशतक कर्णधार हशमतुल्ला शाहिदीच्या नावावर होते. शाहिदीने २०२१ साली झिम्बाब्वेविरुद्ध नाबाद २०० धावा केल्या होत्या. आता रहमत शाह अफगाणिस्तानसाठी कसोटीत सर्वाधिक धावा करणारा फलंदाज ठरला आहे. या सामन्यात फक्त रहमत शाहने नाही तर कर्णधार हशमतुल्ला शाहिदीही झिम्बाब्वेच्या गोलंदाजांसाठी डोकेदुखी ठरला. रहमत शाह बाद झाल्यानंतर शाहिदीने ताकदीने डाव सांभाळला. शाहिदीने आपले शतक पूर्ण केल्यानंतर काही वेळातच अफगाणिस्तानच्या धावसंख्येने चौथ्या दिवसाच्या पहिल्या सत्रात ५०० धावांचा टप्पा पार केला.यापूर्वी झिम्बाब्वे संघानेही दमदार प्रदर्शन केले होते. झिम्बाब्वेसाठी कर्णधार क्रेग इर्विनसह तीन फलंदाजांनी पहिल्या डावात शतके झळकावली.

### अफगाणिस्तानसाठी उत्कृष्ट फलंदाजी

क्रेग इर्विनशिवाय सीन विल्यम्सने संघाकडून सर्वाधिक १५४ धावांची खेळी साकारली. या खेळीत त्याने १७४ चेंडूंचा सामना केला. ज्यामध्ये त्याने १० चौकार आणि ३ षटकार मारले. याशिवाय ब्रेन बेनेटने ११० धावांची नाबाद खेळी करत झिम्बाब्वेला विक्रमी धावसंख्येपर्यंत पोहोचवले. शाहची फलंदाजी अफगाणिस्तानसाठी उत्कृष्ट ठरली. अफगाणिस्तानकडून रहमत शाहने २३४ धावांची खेळी साकारली. या डावात रहमतने ४२४ चेंडूंचा सामना केला, ज्यामध्ये त्याने २३ चौकार आणि ३ षटकारही मारले. यासह रहमत अफगाणिस्तानसाठी कसोटी क्रिकेटमध्ये सर्वात मोठी खेळी खेळणारा फलंदाज ठरला आहे.रहमत शाहने २०० धावांचा टप्पा गाठताच, कसोटी क्रिकेटमध्ये द्विशतक झळकावणारा तो दुसरा अफगाणिस्तानचा फलंदाज ठरला. यापूर्वी अफगाण संघाचे कसोटी क्रिकेटमधील एकमेव द्विशतक कर्णधार हशमतुल्ला शाहिदीच्या नावावर होते.

# आफ्रिका WTC फायनलमध्ये दाखल

## रबाडा-यान्सनच्या भागीदारीसह सेंच्युरियन कसोटीवर कब्जा

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**सेंच्युरियन कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानचा २ विकेट्सनी जागतिक कसोटी चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. दक्षिण आफ्रिका अंतिम फेरीत पोहोचणारा पहिला संघ ठरला आहे. सुपरस्पोर्ट्स पार्क येथे खेळल्या गेलेल्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानने दक्षिण आफ्रिकेसमोर केवळ १४८ धावांचे छोटे लक्ष्य ठेवले होते. दक्षिण आफ्रिकेने १५० धावा करत सामना जिंकला.**




दक्षिण आफ्रिकेच्या या विजयात एडन मार्करम आणि रबाडा-यान्सन जोडीने महत्त्वाची भूमिका बजावली.केवळ तीन धावा करून तो बाद झाला. सुपरस्पोर्ट्स पार्क येथे खेळल्या गेलेल्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिल्या सामन्यात पाकिस्तानने पहिल्या डावात २११ आणि दुसऱ्या डावात २३७ धावा केल्या होत्या. दक्षिण आफ्रिकेने पहिल्या डावात ३०१ धावा आणि दुसऱ्या डावात १५० धावा करत सामना जिंकला. वेगवान गोलंदाजांना विकेटवरून मिळत असलेल्या मदतीमुळे यजमानांना माफक लक्ष्यही गाठतानाही संघर्ष करावा लागला. मात्र, शेवटी मार्को यान्सेन (२४ चेंडूत १६ धावा) आणि कागिसो रबाडा (२६ चेंडूत ३१ धावा) यांनी नवव्या विकेटसाठी ५० चेंडूत ५१ धावांची नाबाद भागीदारी करत दक्षिण आफ्रिकेला ऐतिहासिक विजय मिळवून दिला.दमदार फलंदाजीच्या जोरावर, दक्षिण आफ्रिकेने पाकिस्तानविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना दोन गडी राखून जिंकला.

### प्रोटीज संघाने दमदार पुनरागमन

आयसीसी जागतिक कसोटी चॅम्पियनशिप २०२५ च्या अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. श्रीलंकेविरुद्ध घरच्या मैदानावर २-० अशी मालिका जिंकल्यानंतर प्रोटीज संघ आधीच डब्ल्यूटीसी गुणतालिकेत अव्वल स्थानावर होता. सध्याच्या हंगामात ११ कसोटी खेळलेल्या दक्षिण आफ्रिकेकडे ७ विजयांसह ६६.६७% पीसीटी आहे.सध्याच्या डब्ल्यूटीसीच्या हंगामातील दक्षिण आफ्रिकेचा प्रवास पाहिला तर विदेशात वेस्ट इंडिज आणि बांग्लादेशविरुद्ध दणदणीत विजय मिळवून प्रोटीज संघाने दमदार पुनरागमन केले.